MSSIDC

# महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)

कृपानिधी, ९ वालचंद हिराचंद मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१
**दूरध्वनी - ०२२-२२६२०६२४**

**भारत व्यापार वृध्दी संस्था, नवी दिल्ली** यांच्यामार्फत **दि.१४ ते २७ नोव्हेंबर २०२४** या कालावधीत आयोजित **भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा (भाआंव्यामे)** मध्ये उभारण्यात येणाऱ्या महाराष्ट्र दालनातील गाळयांमध्ये विविध उत्पादने व हस्तकलेच्या वस्तू प्रदर्शित व विक्री करण्यासाठी उदयम नोंदणीकृत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक, हस्तकला कारागीर व महिला बचत गट यांच्याकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्जाचा नमुना संकेतस्थळ येथे उपलब्ध आहे. **https://tinyurl.com/maharashtra-iitf-2024**

गाळयांचे वाटप खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येणार आहे:-

१) गाळयासाठी रु.२५,००० अधिक वस्तू व सेवा कर एवढे सवलतीच्या दरातील भाडे पूर्ण कालावधीकरिता आकारण्यात येईल.

२) प्राप्त अर्जामधून उपलब्ध असलेल्या गाळयांची संख्या, प्रदर्शित करण्यात येणारे उत्पादन/वस्तू याची विक्रीसाठी मागणी, यापूर्वी महामंडळाकडून प्रदर्शनात अर्जदारास देण्यात आलेली संधी या सर्व बाबींचा विचार करुन अर्जदाराची निवड करण्यात येईल.

३) कुठल्याही एक किंवा अनेक अर्जदारांचे अर्ज कुठल्याही कारणाशिवाय स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवीत आहे.

४) पूर्ण भरलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने वर नमूद केलेल्या संकेतस्थळावरच **शुक्रवार, दि.११.१०.२०२४ सायं.५.०० वा पर्यंत** स्वीकारण्यात येतील.

सदर दिनांकानंतर प्राप्त अर्जांचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

**दिनांक : २७.०९.२०२४**
**स्थळ : मुंबई**

**महाव्यवस्थापक**